# महाराष्ट्र लोकसेवा आयोग
# Maharashtra Public Service Commission

मुख्य कार्यालय : ५½, ७ व ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई ४०००२१ दूरध्वनी-२२७९५९०० फॅक्स:२२८८०५२४
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा माळा, फोर्ट, मुंबई ४००००१ दूरध्वनी :२२६७०२१०/१४८/२४८,२२१०२२२२, फॅक्स : २२६७३११५

ई-मेल – sec.mpsc@maharashtra.gov.in वेबसाईट - www.mpsc.gov.in, https://mahampsc.mahaonline.gov.in


क्रमांक : एमआयएस-०६१५/सीआर-०१/२०२१/तीन दिनांक : १९ जानेवारी, २०२१

-: **प्रसिद्धीपत्रक** :-

**विषय** :- खेळाडू आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांच्या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

राज्यातील प्राविण्यप्राप्त खेळाडूंना शासन सेवेतील विविध संवर्गातील नामनिर्देशनाने भरण्यात येणा-या पदांवर नियुक्तीकरीता शासन निर्णय, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक राक्रीधो-२००२/प्रक्र- ६८/क्रीयुसे-२, दिनांक ०१ जुलै, २०१६ तसेच तद्नंतर शासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात आलेल्या आदेशानुसार कार्यपद्धती विहित करण्यात आली आहे.

**२.** यासंदर्भातील शासन शुद्धिपत्रक, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, क्रमांक : राक्रीधो-२००२/प्र.क्र.६८/क्रीयुसे-२, दिनांक २४ ऑक्टोबर, २०१९ अन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार आयोगाकडून सन २०२० मध्ये आयोजित करण्यात आलेल्या खालील जाहिरातीस अनुसरून संबंधित खेळाडू आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांना त्यांच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ विहित कागदपत्रे सादर करणे अनिवार्य आहे:-

| अ.क्र. | जाहिरात क्रमांक | परीक्षेचे नाव | अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|---|
| (१) | १९/२०१९ | राज्य सेवा पूर्व परीक्षा - २०२० | १३ जानेवारी, २०२० |
| (२) | ०५/२०२० | महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित, गट-ब संयुक्त पूर्व परीक्षा - २०२० | १९ मार्च, २०२० |
| (३) | ०६/२०२० | महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा पूर्व परीक्षा – २०२० | ०७ एप्रिल, २०२० |

**३.** आयोगाकडून प्रसिद्ध करण्यात आलेल्या उपरोक्त जाहिरातीस अनुसरून अर्ज सादर करताना खेळाडू आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या दाव्याच्या पृष्ठ्यर्थ आवश्यक कागदपत्र/प्रमाणपत्रे विहित मुदतीत सादर करण्यासंदर्भात खालीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे :-

(१) उपरोक्त परीक्षांकरीता आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीद्वारे अर्ज सादर करताना खेळाडू आरक्षणाचा दावा केलेल्या उमेदवारांनी संबंधित उमेदवार वास्तव्यास असलेल्या विभागातील सक्षम क्रीडा प्राधिकरणाने निर्गमित केलेला क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल अथवा सक्षम क्रीडा प्राधिकरणाकडे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीकरीता केलेल्या अर्जाची पोचपावती यापैकी लागू असेल ती कागदपत्रे, त्या कागदपत्रांच्या स्कॅन प्रती पुरावा म्हणून सादर करावीत.

(२) वैध क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल अथवा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी करीता केलेल्या अर्जावरील पोचपावतीचा दिनांक संबंधित जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचा असणे अनिवार्य आहे.

(३) खेळाडू आरक्षणाच्या दाव्याच्या अनुषंगाने वरील प्रमाणे क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल आणि/अथवा संबंधित जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी सक्षम क्रीडा प्राधिकरणाने प्रमाणपत्र पडताळणीकरीता केलेल्या अर्जाची पोचपावती सादर न केल्यास संबंधित उमेदवाराचा खेळाडू आरक्षणाचा दावा रद्द करण्यात येईल व अशा पद्धतीने रद्द केलेला दावा नंतरच्या कोणत्याही टप्प्यावर विचारात घेतला जाणार नाही.

(४) वैध क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवालाचा दिनांक संबंधित जाहिरातीस अनुसरून आयोगाकडून विहित करण्यात आलेल्या अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वीचा नसल्यास, अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीकरीता केलेल्या अर्जाची पोचपावती सादर करणे आवश्यक आहे.

(५) क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल अथवा क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी करीता केलेल्या अर्जाची पोचपावतीची प्रत आयोगास पाठविताना त्यावर उमेदवाराने स्वत:चे नाव, परीक्षेचे नाव, अर्ज नोंदणी क्रमांक नमूद करून प्रथम स्वसाक्षांकित करावे व त्यानंतर प्रमाणपत्र/पोचपावती स्कॅन करणे आवश्यक आहे.

(६) आयोगास सादर केलेल्या पुरावा/कागदपत्राच्या आधारे उमेदवार संबंधित संवर्गातील निवडीसाठी पात्र आढळून न आल्यास त्याचा खेळाडू आरक्षणाचा दावा त्या-त्या संवर्गासाठी रद्द करण्यात येईल.

(७) खेळाडू आरक्षणासाठी अर्जाद्वारे दावा केलेल्या उमेदवारांनी त्यांच्या दाव्यापृष्ठ्यर्थ वरीलप्रमाणे वैध पुरावा सादर न केल्यास अथवा आयोगाकडे सादर केलेली कोणतीही कागदपत्रे अथवा प्रमाणपत्रे नंतर कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही कारणास्तव खोटी, बनावट, खाडाखोड केलेली, अवैध, संबंधित शासन आदेश/नियमानुसार जारी न केलेली अथवा सक्षम अधिकाऱ्याने प्रदान न केलेली असल्याचे आढळून आल्यास अशी कृती आयोगाची फसवणूक करणारी समजण्यात येऊन आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व परीक्षा व निवडींपासून उमेदवारास आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार प्रतिरोधित करण्यात येईल तसेच अशा उमेदवारांविरुद्ध संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार कारवाई सुद्धा करण्यात येईल.

**४.** वरीलप्रमाणे वैध क्रीडा प्रमाणपत्र पडताळणी अहवाल आणि/अथवा संबंधित जाहिरातीस अनुसरून अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापूर्वी क्रीडा पडताळणी करीता सक्षम प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जाच्या पोचपावतीची स्कॅन प्रत pre-examination@mpsc.gov.in या इमेल आयडीवर **दिनांक ०५ फेब्रुवारी, २०२१** पर्यंत सादर करणे अनिवार्य आहे. त्यानंतर प्राप्त विनंतीचा विचार करण्यात येणार नाही.

सहसचिव, परीक्षापूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग